पुढारी

# शिवाजी विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती तथा अंत्योदय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. एन. वासंबेकर आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात उपाध्याय जयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती तथा अंत्योदय दिन रविवारी उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. एन. वासंबेकर, आदी उपस्थित होते.

26 SEP 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणसांना जवळ आणण्याचे काम 'एनएसएस'ला करावे लागणार

## अभय जायभाये : विवेकानंद कॉलेजमध्ये वर्धापन दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेमधून (एनएसएस) विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मता, बंधुता, समता, स्वावलंबन, चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व ही सर्व मूल्ये आत्मसात करता येतात. बदलत्या काळात माणसांना जवळ आणण्याचे काम 'एनएसएस'च्या स्वयंसेवकांना करावे लागणार आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे एनएसएसचे संचालक प्रा. अभय जायभाये यांनी शनिवारी केले.

विवेकानंद कॉलेजमध्ये एनएसएस वर्धापन दिन कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव डॉ. पी. एस. पांडव होते.

समाजाचे काही तरी देणे लागतो या भावनेतून एनएसएसचे व्यासपीठ काम करीत असते. समाजातील प्रत्येक चांगल्या घडामोडीत एनएसएसचा सहभाग हा असतो. सामाजिक जबाबदारीची भावना वाढीस लागते त्यामुळे महाविद्यालयाच्या विकासात एनएसएस विभाग महत्त्वपूर्ण असतो, असे डॉ. पांडव यांनी सांगितले.



कोल्हापुरात शनिवारी विवेकानंद कॉलेजमध्ये एनएसएस वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. अभय जायभाये यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी प्रा. संदीप पाटील उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रिया पाटील, इंद्रजा गोरे, कल्याणी पाटील, स्वयंम सावंत, संदीप पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. बी. के. गावित, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी, आदी उपस्थित होते. प्रा. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. पी. आर. बागडे यांनी करून दिली. डॉ. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जी.एस. उबाळे यांनी आभार मानले.

२ 6 SEP 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एम.फिल., पीएच. डी.ची ३,४७० विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने एम. फिल.-पीएच.डी.साठी शनिवारी प्रवेश परीक्षा झाली. ४,८८८ पैकी ३,४७० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. १,४१८ विद्यार्थी गैरहजर राहिले. विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी एम. फिल.- पीएच.डी.साठीची प्रवेश परीक्षा घेण्यात आली.

शहाजी छत्रपती महाविद्यालय, मधुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली व यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा ही परीक्षा केंद्रे होती. दि.२४ सप्टेंबर रोजी राज्यशास्त्र, भूगोल, मास कम्युनिकेशन, जर्नालिझम, इतिहास, संख्याशास्त्र, समाजशास्त्र, कॉम्प्युटर सायन्स, टेक्स्टाईल इंजिनिअरिंग आदी विषयांच्या परीक्षा सुरळीत झाल्याची माहिती विद्यापीठ परीक्षा विभागाने दिली.

26 SEP 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून ५१६ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ५१६ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

विद्यापीठातर्फे ७४७ अभ्यासक्रमांपैकी विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षा एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने नुकत्याच पार पडल्या आहेत. २४ सप्टेंबर रोजी एमएस्सी (गणित) व एम.ए. (मराठी) विषयांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठाच्या ७४७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा 'ओएमआर' उत्तरपत्रिकांचा वापर करून घेण्यात आल्या आहेत.